पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे-४११०१८
आकाशचिन्ह व परवाना विभाग
दूरध्वनी ६७३३११२२ ०२०-Email-skysign@pcmcindia.gov.in

**नविन जाहिरात फलक उभारणी संदर्भातील कागदपत्रे**

१) प्रस्तावित जाहिरात फलक ज्यांचे जागेत उभा करावयाचा असेल त्या जमिनीच्या/इमारतीच्या मालकाकडून घेतलेले ना-हरकत प्रमाणपत्र

२) प्रस्तावित जाहिरात फलक हा महानगरपालिका, शासन, बंदर विश्वत व्यवस्था, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, महानगर प्रदेश विकास प्राधिकरण इत्यादींसारख्या सार्वजनिक प्रधिकरणांकडून भाडेपट्ट्याने देण्यात आलेली असेल तर, पट्टाकाराचे (leassor) ना-हरकत प्रमाणपत्र देखील आवश्यक आहे.

३) प्रस्तावित जाहिरात फलक हा ज्या इमारतीच्या गच्चीवर उभा करावयाचा आहे त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र व किंवा इमारतीतील सभासदांपैकी किमान २/३ सहमतीने दिलेले ना- हरकत प्रमाणपत्र.

४) सहकारी गृहनिर्माण संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र व त्याच सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सर्वसाधारण सभेच्या बैठकीमध्ये रीतसर मंजूर केलेल्या ठरावाची प्रमाणित केलेली प्रत.

५) प्रस्तावित जाहिरात फलक उभारण्याचे ठिकाण दर्शिविणा-या आधारभूत नकाशांच्या संरचना अभियंत्याने साक्षांकिंत केलेल्या दोन प्रती.

६) प्रस्तावित जाहिरात फलक स्थळाची आखणी व रंगयोजना आणि त्याचे नेमके स्थान दर्शविणारे रेखाचित्र तसेच बाह्य प्रकाश व्यवस्थेसह संगणक निर्मित संकल्पचित्र यांच्या दोन प्रती.

७) प्रस्तावित जाहिरात फलक स्थळावरील प्रस्तावित जाहिरात फलकाच्या चिन्हांकनासह त्या स्थळाची १० × ८ इंच आकाराची दोन छायाचित्रे.

८) प्रस्तावित जाहिरात फलक उभा करावयाच्या स्थानामध्ये ४० मीटरच्या आत एकाच रांगेत कोणतीही झाडे किंवा अन्य कोणताही फलक अस्तित्वात असल्याचे, प्रस्तावित जाहिरात फलकाच्या आकारासह दर्शविणा-या, त्या स्थानाच्या नकाशाच्या २ प्रती.

९) आवश्यकता असल्यास, पोलीस (वाहतूक) विभागाच्या सक्षम अधिकारी आणि महानगरपालिकेचा उद्यान विभागाचा ना-हरकत प्रमाणपत्र.

१०) ज्या ठिकाणी आवशयकता असेल त्या ठिकाणचे भारत सरकारच्या नागरी विमानचालन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र.

११) लायसन्स प्राप्त संरचना अभिभयंत्याने मान्य केलेला संरचनात्मक मांडणी किंवा आराखडा.

१२) प्रस्तावित जाहिरात फलक ज्या इमारतीवर उभारावयाचा असेल त्या इमारतीचे लायसन्सप्राप्त संरचना अभियंत्याचे संरचना-मजबुती प्रमाणपत्र आणि फलकाच्या संरचनेचे संरचना-मजबुती प्रमाणपत्र.

१३)महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम,२०१७ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र.(Shop Act Certificate) व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र(General Service Tax Certificate).

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे-४११०१८**
आकाशचिन्ह व परवाना विभाग
दूरध्वनी ६७३३११२२ ०२०-Email-skysign@pcmcindia.gov.in

**नुतनीकरण करताना सादर करावयाची द्यावयाची कागदपत्रे**

१) मिळकतीच्या/जमिनीच्या,मालकाच्या/महापालिकेच्या किंवा अन्य सार्वजनिक प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे ना-हरकत प्रमाणपत्र.

२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकृत लायसन्स प्राप्त संरचना अभियंत्याचे संरचना मजबुतीचे (स्थिरतेचे) प्रमाणपत्र. (अधिकृत लायसन्स प्राप्त संरचना अभियंत्याची यादी वेबपोर्टलवर उपलब्ध आहे.)

३) जाहिरात फलकाच्या १० X ०८ इंचाचे छायाचित्राच्या दोन प्रती.

४) महानगरपालिकेने जाहिरात फलकासाठी दिलेला परवाना (फॉर्म – क ) प्रत.